follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

www.rajdand.com

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

* RNI Regd. No. 72105/99 | * वर्ष २५, अंक १९५ | सातारा, शनिवार, २३ मार्च, २०२४ | * पाने ८ (सुप्रभात) | किंमत रू ५/-

## भारताच्या पहिल्या रीयूजेबल लाँच व्हीकलची चाचणी यशस्वी



**दिल्ली :** भारताची अवकाश संशोधन संस्था इस्रोने आज एक मोठी कामगिरी पार पाडली. इस्रोने आपल्या पुष्पक या रीयूजेबल लाँच व्हीकलची चाचणी यशस्वीपणे पूर्ण केली. कर्नाटकातील चित्रदुर्ग येथे असणाऱ्या एअरोनॉटिकल टेस्ट रेंजमध्ये सकाळी ७:१० च्या सुमारास पुष्पकचं यशस्वी लँडिंग झालं. हे ऐतिहासिक यश असल्याचं इस्रोने म्हटलं आहे. हे पुष्पक विमान ऑटोमॅटिकली सुरक्षितपणे लँड झालं हे विशेष!

**काय होणार फायदा?**

रीयूजेबल, म्हणजेच पुन्हा वापर करता येणारे लाँच व्हीकल तयार केल्यामुळे अंतराळ मोहिमांवरील खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. लाँच व्हीकलमध्ये असणारी यंत्रे, पार्ट्स अत्यंत महागडे असतात. आतापर्यंत एकदा प्रक्षेपित केलेलं यान पुढे अंतराळातच सोडून द्यावं लागत होतं. मात्र, आता या चाचणीनंतर हे यान पृथ्वीवर पुन्हा आणता येईल अशी खात्री झाली आहे.

**अंतराळातील कचरा होणार कमी**

या रियूजेबल लाँच व्हीकलचा फायदा केवळ इस्रोलाच होईल असं नाही. लाँच व्हीकल पुन्हा जमीनीवर आणता येणं शक्य झाल्यामुळे अंतराळातील कचरा देखील कमी होण्यास मदत मिळेल. यामुळे सर्वांनाच मोठा फायदा होणार आहे.

**कित्येक वर्षांपासून सुरू आहेत प्रयत्न**

गेल्या कित्येक वर्षांपासून इस्रो रीयूजेबल लाँच व्हीकल बनवण्यासाठी प्रयत्न करत आहे. यापूर्वी दोन वेळा अशा रॉकेटचं यशस्वी लँडिंग देखील करण्यात आलं आहे. गेल्या वर्षी अशा एका आरएलव्हीला वायु दलाच्या चिनुक हेलिकॉप्टरमधून सोडण्यात आलं होतं. सुमारे साडेचार किलोमीटर उंचीवरुन खाली पडलेलं हे व्हीकल सुरक्षितपणे रनवेवर लँड झालं होतं. ठ्ठ्तची पहिली चाचणी २३ मे २०१६ रोजी श्रीहरीकोटा येथे पार पडली होती. यानंतर काळानुसार त्यामध्ये भरपूर बदल करण्यात आले. आजच्या चाचणीमध्ये पुष्पक विमान पूर्णपणे स्वयंचलितपणे रनवेवर लँड झालं. पॅराशूट, लँडिंग गिअर ब्रेक आणि नोज व्हील स्टिअरिंग सिस्टीम या सर्व यंत्रणा ऑटोमॅटिकली कार्यान्वित झाल्या आणि हे विमान आरामात लँड झालं.

## महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात पाच ठिकाणी मतदान

### अर्ज भरण्यासाठी होणार इच्छुकांची धावाधाव

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने काही दिवसांपूर्वी लोकसभा निवडणुकांच्या (डेज्ञ डरलहर एश्रशलींळेप २०२४) तारखा जाहीर केल्या आहेत. देशात एकूण सात टप्प्यात निवडणुका होणार असून महाराष्ट्रात पाच टप्प्यात निवडणुका होतील. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असून प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रात पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा-गोंदिया या पाच लोकसभा मतदारसंघासाठी १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. २० मार्चपासून उमदेवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे.

अर्ज भरण्यासाठी होणार इच्छुकांची धावाधाव

२७ मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करावयाचा आहे. परंतु यामध्ये शनिवार, रविवार व सोमवारी धुलीवंदनाची सुटी असल्याने उमदेवारीसाठी दोनच दिवस मिळणार असल्याने उमेदवारी अर्ज भरण्यासाठी इच्छूक उमेदवारांची धावाधाव होणार आहे.

**महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान होणार**

१९ एप्रिल - रामटेक , नागपूर, भंडारा - गोंदिया, गडचिरोली- चिमूर, चंद्रपूर

२६ एप्रिल - बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ- वाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी

७ मे - रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी - सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकंणगले

१३ मे - नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी, बीड

२० मे - धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, उत्तर मुंबई, उत्तर - पश्चिम मुंबई, उत्तर - पुर्व मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मध्य मुंबई , दक्षिण मुंबई.




लोकसभेचा कार्यकाळ १६ जून २०२४ ला संपणार

१७ व्या लोकसभेचा कार्यकाळ १६ जून २०२४ रोजी संपणार आहे. आंध्र प्रदेश, ओडिशा, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीमच्या विधानसभांचा कार्यकाळ देखील संपुष्टात येणार आहे. २४ जून रोजी मुदत संपत आहे. जम्मू-काश्मीरमध्येही विधानसभा निवडणुका होणार आहेत.

### भाजपाकडून उमेदवारांची चौथी यादी जाहीर

**लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे. या यादीत एकूण १५ जागांसाठी उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. यात पुदूच्चेरी तसेच तमिळनाडू राज्यातील १४ जागांचा समावेश आहे. भाजपने या यादीत तमिळनाडूतील प्रसिद्ध अभिनेत्री राधिका सरथकुमार यांनादेखील तिकीट दिले आहे. राधिका सरथकुमार या विरुदनगर येथून निवडणूक लढवणार आहेत.**

## शिवतारे भाजपच्या कमळ चिन्हावरही लढण्यास तयार

### मुख्यमंत्र्यांसमोर ठेवला नवा प्रस्ताव

**मुंबई :** शिवसेना नेते आणि माजी मंत्री विजय शिवतारे हे बारामतीतून अजित पवारांना आव्हान देण्यासाठी अद्यापही ठाम आहेत. त्यातच आज त्यांनी आणखी एक प्रस्ताव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर ठेवला आहे. आपण भाजपचा उमेदवार म्हणून बारामतीतून निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळं आता त्यांच्या या प्रस्तावाची महायुती कशी दखल घेते हे पाहणं गरजेचं आहे.

विजय शिवतारे यांनी टीव्ही ९ शी बोलताना सांगितलं की, महायुतीला विनंती करुन जर शिवसेनेनं बारामतीची जागा मिळवली तर धनुष्यबाण या चिन्हावर आपण ही निवडणूक जिंकू शकतो. गेल्या काही दिवसांत मी मतदारसंघात फिरल्यानंतर लोकांमध्ये अंडर करंट काय आहे, हे मला जाणवलं आहे त्याची माहिती मी वरिष्ठांना दिली आहे. त्यामुळं माझ्यामध्येही एक आत्मविश्वास आला आहे. मुळात गेल्या दहा-वीस वर्षात बारामतीची जागा महायुतीत भाजपची राहिली आहे. त्यामुळं अगदीच गरज पडली तर मी भाजपच्या कमळ या चिन्हावरही बारामातीतून लढवण्यास माझी हरकत नाही. दोन दिवस मी जे विचारमंथन केलं आहे लोकांशी बोललो आहे त्यावरुन या निर्णयापर्यंत पोहोचलो आहे. अपक्ष हे नंतरचा भाग आला पण कदाचित महायुतीतून अशा पद्धतीनं जर निर्णय झाले तर ते खूपच सोईस्कर होतील. त्यामुळं जर निवडून येण्याच्या मेरिटचा विचार केला तर मोदींना पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी एक एक खासदार निवडून येणं महत्वाचं आहे.

## ३१ मार्चनंतरही निर्यातबंदी कायम

**मुंबई :** लोकसभेच्या निवडणुकीत उत्तरेकडील राज्यात कांद्याचे भाव वाढून मतांचे नुकसान होऊ नये म्हणून विद्यमान केंद्र सरकार कांदभाववाढीला घाबरले आहे. म्हणूनच त्यांनी गरज नसताना ३१ मार्च २४ नंतरही कांदा निर्यातबंदी कायम ठेवली आहे. मात्र या निवडणुकीत कांदा उत्पादकांसह शेतकरी त्यांना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही,अशी घणाघाती टिका महाराष्ट्र कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने केली आहे.

केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने आज दिनांक २२ मार्च रोजी एक नोटीफिकेशनकाढून ३१ मार्च २४ नंतरही कांदा निर्यातबंदी पुढील सूचनेपर्यंत कायम राहणार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे येत्या ८ दिवसांनी तरी निर्यातबंदी हटेल आणि आपल्या उन्हाळी कांद्याला चांगला बाजार भाव मिळेल या प्रतिक्षेत असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.



आज सायंकाळी वाणिज्य मंत्रालयाच्या अखत्यारित असलेल्या परकीय व्यापार विभागाचे महासंचालक यांचे अतिरिक्त सचिव संतोष कुमार सरंगी यांनी कांदा निर्यातबंदी कायम राहणार असे नोटीफिकेशन प्रसिद्ध केले आहे. त्यात म्हटल्याप्रमाणे ७ डिसेंबर २३ रोजी केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी लागू केली होती. ती ३१ मार्च २४ पर्यंत राहणार होती. मात्र नव्या निर्यात धोरणानुसारपुढील सूचना येईपर्यंत ही कांदा निर्यातबंदी ३१ मार्चनंतरही वाढविण्यात आली असल्याचे त्यात म्हटले आहे.कोड ०७०३ १० १९ अंतर्गत ३१ मार्च २०२४ पर्यंत वैध असलेल्या कांद्याच्या निर्यातीवरील निर्यात प्रतिबंध पुढील आदेशापर्यंत वाढवण्यात आला, असेही यात म्हटले आहे.

## अरविंद केजरीवाल यांना मद्य गैरव्यवहारप्रकरणी २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी

**दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्ली राऊस एव्हेन्यु कोर्टाने २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे. काल (२१ मार्च) अटक झाल्यानंतर त्यांना आज राऊस एव्हेन्युक कोर्टात सादर करण्यात आलं. त्यांच्या बाजून अभिषेक मनू सिंघवी यांनी बाजू लढवली. तर, ईडीने त्यांच्या १० दिवसांची कोठडी मागितली होती. परंतु, कोर्टाने त्यांना सहा दिवसांची कोठडी दिली आहे.



आपचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांना गुरुवारी रात्री उशिराने ईडीने अटक केली. या अटकेविरोधात आपने लागलीच सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसंच, तातडीच्या सुनावणीचीही मागणी करण्यात आली होती. परंतु, आज (२२ मार्च) आपने ही याचिका मागे घेतली. त्यानंतर, ईडीने अरविंद केजरीवाल यांना ट्रायल कोर्टात हजर केले.

दिल्लीच्या ट्रायल कोर्टात आज सुनावणी पार पडली. दोन्ही बाजूने जोरदार युक्तीवाद करण्यात आला. न्यायमूर्तींनी दोन्ही बाजू ऐकून घेतली. आज सायंकाळीच सुनावणी पूर्ण झाल्यानंतर निकाल राखून ठेवण्यात आला होता. त्यानंतर, आता कोर्टाने निकाल जाहीर केला असून २८ मार्चपर्यंत त्यांना कोठडी सुनावण्यात आली आहे.

रिमांड सुनावणी दरम्यान, ईडीने आरोप केला की केजरीवाल यांना दिल्ली मद्य धोरण २०२१-२२ तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणी करण्यासाठी साऊथ ग्रुपकडून अनेक कोटी रुपये लाच म्हणून मिळाले आहेत. ईडीतर्फे हजर असलेले अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (एएसजी) एसव्ही राजू यांनी राऊस अव्हेन्यू कोर्टात सांगितले की, केजरीवाल यांनी गोव्याची निवडणूक लढवण्यासाठी साऊथ ग्रुपमधील काही आरोपींकडून १०० कोटी रुपयांची मागणी केली होती.

गोवा निवडणुकीत वापरलेले ४५ कोटी रुपये लाच चार हवाला मार्गांवरून आल्याचे मनी ट्रेलवरून दिसून येते, असा दावाही राजू यांनी केला. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या इतिहासात एका विद्यमान मुख्यमंत्र्यांना अटक होण्याची ही पहिलीच वेळ आहे, त्यांच्या पक्षाच्या चार नेत्यांना अटक करण्यात आली आहे, याकडेही ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी लक्ष वेधले.

## रणजितसिंह निंबाळकरांच्या माढ्यात भेटीगाठी

**माढा :** माढा लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक - निंबाळकर यांनी माढ्यामध्ये माजी आमदार धनाजीराव साठे, जिल्हा दूध संघाची माजी संचालक राजेंद्र चवरे यांच्यासह अनेकांच्या भेटीगाठी घेऊन राजकीय चाचणी केली.

खासदार निंबाळकर यांनी माढा तालुक्यातील निमगावमध्ये जाऊन आमदार बबनराव शिंदे व आमदार संजय शिंदे यांची भेट घेतल्यानंतर माढ्यात जिल्हा दूध संघाचे माजी संचालक राजेंद्र चवरे यांची भेट घेतली. यावेळी नगरसेविका अनिता चवरे यांनी



त्यांचे औक्षण केले.

यावेळी राजेंद्र चवरे यांनी येत्या लोकसभा निवडणुकीत खासदार निंबाळकर हे प्रचंड मताधिक्याने निवडून येतील व केंद्रीय मंत्रिमंडळात जातील, असे मत व्यक्त केले. त्यानंतर निंबाळकर यांनी काँग्रेसचे माजी आमदार अ‍ॅड. धनाजीराव साठे यांच्या निवासस्थानी भेट दिली. नगराध्यक्षा अ‍ॅड. मीनल साठे यांनी निंबाळकर यांचे स्वागत केले.

**माढा लोकसभेतील मतदार संख्या**

**पुरुष मतदार - ८,५१,२३३**
**महिला मतदार - ७,८१,६८९**
**इतर मतदार - ५९**
**एकूण मतदार - १९,८१,१५०**

नगरसेवक शहाजी साठे यांच्या घरी जाऊन देखील खासदार निंबाळकर यांनी भेट देत राजकीय परिस्थितीवर चर्चा केली. माढा लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून भाजपमधील रणजितसिंह नाईक - निंबाळकर व अकलूजचे मोहिते पाटील यांच्यातील विसंवादाच्या पार्श्वभूमीवर या गाठीभेटींना राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

यावेळी भाजपचे माण खटावचे आमदार जयकुमार गोरे, भाजपचे जिल्हा अध्यक्ष चेतनसिंह केदार, लोकसभा प्रमुख जयराज शिंदे, राजेश शिंदे उपस्थित होते.

## कोकणातील शेतकऱ्यांवर दुहेरी संकट? काजू उत्पादनात घट; दरही कमी

**पुणे :** अवकाळी पाऊस, धुके, ढगाळ हवामानाचा फटका बसल्यामुळे कोकणातील काजूचे उत्पादन जेमतेम ४० टक्क्यांवर आले आहे. एकीकडे उत्पादनात दुष्काळ असताना दुसरीकडे कवडीमोल दरामुळे काजूउत्पादकांसमोर दुहेरी संकट निर्माण झाले आहे. जानेवारी महिन्यातील दुसऱ्या आठवड्यात कोकणाला अवकाळी पाऊस, धुके आणि ढगाळ हवामानाचा फटका बसला. त्यामुळे काजूच्या झाडांना पहिल्या टप्प्यात आलेला मोहोर जळून गेला. सध्या उत्पादित होत असलेले काजू दुसऱ्या टप्प्यात आलेल्या मोहोरापासून मिळत आहेत. सरासरीच्या जेमतेम ४० टक्के काजूचे उत्पादन मिळत



आहे.

दापोली कृषी विद्यापीठाने काजू बीला प्रतिकिलो १५० रुपये दर निश्चित केला आहे. प्रत्यक्षात सिंधुदुर्गसह परिसरातील काजूउत्पादकांना काजू बीला प्रतिकिलो १०० ते ११० रुपये प्रतिकिलो दर मिळतो आहे. उत्पादन खर्चही भरून न निघणाऱ्या कवडीमोल दरामुळे शेतकरी हताश झाले आहेत. गोवा सरकारने काजू बीखरेदीचा दर प्रतिकिलो १५० रुपये निश्चित केला असताना आम्हाला काजू १०० ते ११० रुपये दराने विकावे लागत आहेत, अशी माहिती सिंधुदुर्ग शेतकरी व फळ बागायतदार संघाचे अध्यक्ष विलास सावंत आणि कुडाळ येथील काजूउत्पादक नितीन गोलटकर यांनी दिली.

मागील वर्षी राज्य सरकारने २०० कोटी रुपयांच्या काजू बोर्डाची घोषणा केली. आजअखेर काजू बोर्डाच्या कामाला सुरुवात झालेली नाही. काजू बोर्ड केवळ कागदावरच राहिले आहे.

आता सरकारने काजू उत्पादकांसाठी प्रतिकिलो १० रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. पण, अनुदान मिळण्यासाठीचे निकष पाहता, एकूण शेतकऱ्यांपैकी केवळ १० ते १२ टक्के शेतकऱ्यांनाच ते मिळू शकते. भौगोलिक मानांकन मिळालेला वेंगुर्ला काजूही कवडीमोल दराने विकावा लागत आहे. असेच नुकसान होत राहिल्यास शेतकरी आत्महत्येचे लोण कोकणात येण्यास वेळ लागणार नाही, अशी भीती सिंधुदुर्ग शेतकरी व फळ बागायतदार संघाचे अध्यक्ष विलास सावंत यांनी व्यक्त केली.

### उत्पादनात झाली मोठी घट

**मोहोर येण्याच्या काळात अवकाळी पाऊस, ढगाळ हवामान आणि धुके पडल्यामुळे काजूचा मोहोर जळून गेला. काजूच्या अनेक बागा पूर्णपणे वाया गेल्या आहेत. सरासरी ४० टक्क्यांपर्यंत काजू बीचे उत्पादन मिळत आहे. उत्पादनात मोठी घट झाली आहे, अशी माहिती वेंगुर्ला तालुका कृषी विभागाचे तंत्रज्ञान व्यवस्थापक धनंजय गोलम यांनी दिली**

# कोल्हापुरातील बैठकीत निर्धार



**वारणानगर :** सन २०१३ मध्ये सत्तेवर आलेस ९० दिवसात पेन्शनवाढ करण्याचे आश्वासन दिले दहा वर्षे सत्तेवर राहून देखील हे आश्वासन पाळले नाही त्यामुळे पेन्शनरांची फसवणूक केलेल्या भाजपा - युती सरकारला येत्या निवडणूकीत हिसका दाखवू असा इशारा निवृत्त कर्मचारी ईपीएस ९५ राष्ट्रीय समन्वय समितीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष पुंडलिक पांडे यांनी दिला.

येथील कॉ.संताराम पाटील सभागृहात पेन्शनरांच्या झालेल्या बैठकीत सत्ताधारी भाजपा - मित्रपक्षाच्या उमेदवारांना मतदान न करण्याचा ठराव एकमुखाने करण्यात आला.

पांडे म्हणाले १९९५ मधील ईपीएस पेन्शनबाबत वारंवार केंद्र सरकारकडे मागण्या करत आहे. उत्पादक व सेवा क्षेत्रातील निमसरकारी,सहकारी,खासगी आस्थापनांसह १८६ उद्योग-व्यवसायातील पेन्शनधारकांची ९ हजार रुपये पेन्शन करा, त्यांना महागाई भत्ता द्या, अशी मागणी आहे. मात्र, या सरकारने पेन्शन फंडातील पैसे भांडवलदारांना देऊन पेन्शनधारकांवर अन्याय केला आहे असे सांगितले.

केंद्र सरकारकडे सेवानिवृत्त कर्मच्याऱ्यांची मार्च २०२३ च्या महालेखापालांच्या अहवालानुसार ची रक्कम ७ लाख ८० हजार ३०८ कोटी रुपये सरकारकडे जमा आहे. त्या जमा रकमेवर ५१ हजार ९८५ कोटी रु.व्याज मिळते, त्या व्याज रक्कमेतून पेन्शन धारकांना वार्षिक पेन्शनसाठी १४ हजार ४४४ कोटी इतका खर्च केला जातो,अतिरिक्त व्याज रक्कम ३७ हजार ५४० कोटी रुपये शिल्लक रक्कम राहते. निवृत्तीवेतन धारकांची दावा न केलेली रक्कम ६८ हजार ७९० कोटी रुपये सरकारकडे जमा आहे निव्वळ व्याज दिले तर चार पट पेन्शन वाढ होते तरी देखील सरकार हक्कांची पेन्शन वाढवत नाही असे राष्ट्रीय सदस्य शिवाजी सावंत (भोगावती) यांनी सांगितले.

पेन्शनरांनी दहा वर्षात दिल्लीत व देशात आंदोलन केले पेन्शन वाढीसाठी केंद्राने नेमलेल्या समितीचे अहवाल प्राप्त झाल्यावर देखील सरकारने पेन्शनरांच्या तोंडाला पाने पुसली त्यामुळे पेन्शन धारकात असंतोष आहे ७८ लाख पेन्शनर व २८ कोटी कार्यरत पेन्शनर या निवडूकीत सत्ताधारी सरकारच्या विरोधात मतदान करतील यासाठी पेन्शनरांच्या कुटूबांत व नातेवाईक यांच्यांत संघटना जनजागृती करून येत्या लोकसभा निवडणुकीत सरकारला हिसका दाखवू असे भारतीय पेन्शनर्स समन्वय समितीचे सदस्य कॉम्रेड अतुल दिघे यांनी सांगितले.

या सभेत केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या. राष्ट्रीय सदस्य शिवाजी देसावळे, राष्ट्रीय समन्वयक दिलीप पाटील कोल्हापूर जिल्हा पेन्शनर संघटनेचे मारुती डोंगळे, शंकर चौगले, आर. के. पाटील, बी.एन. कुंजीरे, बी.एस. पाटील यांनी देखील मनोगते व्यक्त केली. संघटनेचे पदाधिकारी, पेन्शनर्स उपस्थित होते. गोकुळ दुध पुरवठा सेवा संस्था कर्मचारी संघटनेचे नेते के.डी. पाटील यांनी सूत्रसंचलन केले. एसटी कामगार संघटनेचे अनिल शिंदे यांनी आभार मानले.

# बारामतीकरांसमोर शरद पवारांनी केलं लेकीचं कौतुक



**बारामती :** लोकसभा मतदारसंघात मागील तीन टर्मपासून खासदार असलेल्यासुप्रिया सुळेयांच्यासाठी यंदाची निवडणूक अत्यंत आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. कारण त्यांच्याविरोधात या निवडणुकीत राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्रीअजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या मैदानात उतरण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवरसुप्रिया सुळेयांचा विजय सुकर व्हावा, यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्षशरद पवारयांना पायाला भिंगरी बांधली असून ते मतदारसंघ पिंजून काढत आहेत. आज पवार यांच्या उपस्थितीत बारामतीत स्वाभिमानी व्यापारी महासंघाचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलतानाशरद पवारांनीआपल्या खासदार असलेल्या कन्येचं कौतुक करत मतदारांना साथ देण्याचं आवाहन केलं आहे.

मेळाव्यात बोलताना शरद पवार म्हणाले की, लोकांचंदखणंमांडणारे जे खासदार आहेत त्यामध्ये तुमच्या खासदाराचे नाव हे फार वर आहे, त्यामुळे अशा व्यक्तीला तुम्ही लोकांनी यापूर्वी निवडून दिलं, ती संधी या ही वेळेला द्याल अशा प्रकारची अपेक्षा करतो, अशा शब्दांत शरद पवार यांनी लेकीवर स्तुतीसुमने उधळली. तसंच खूण बदलली, कोर्टामध्ये काही गोष्टी गेल्या आणि सुप्रीम कोर्टाने व निवडणूकआयोगाने तुतारी वाजवणारा माणूस ही नवीन खूण दिलेली आहे, ती तुमच्या लक्षात ठेवावी लागेल, तिच्या पुढील बटण दाबलं पाहिजे आणि तुम्हा लोकांच्या मनात जे आहे ते त्यानिमित्ताने आपल्या बटण दाबण्यातून तुम्ही व्यक्त करावं, असं आवाहनही पवारांनी केलं आहे.

बारामतीतील व्यापाऱ्यांना कोणत्या शब्द दिला ? व्यापारी महासंघाच्या मेळाव्यात बोलताना शरद पवार यांनी नव्याने तयार करण्यात आलेल्या संघटनेला बळ देण्याचं आश्वासन दिलं आहे.

कुठलाही देश, कुठलेही राज्य, कुठलाही तालुका हा पुढे न्यायचा असेल तर व्यापार वाढला पाहिजे, व्यवहार वाढला पाहिजे.

त्यामध्ये दोन भाग आहेत एक मोठा व्यापार करणारे लोक, दुसरे छोटे लोक. आजपर्यंत बारामतीमध्ये व्यापारी संघटना अनेक वर्षे काम करत आहेत. पण त्यामध्ये छोट्या लोकांचा विचार हा कमी होता, ही भूमिका आम्हा लोकांच्या आता लक्षात आली.

श्रीयुत सस्ते व श्रीयुत पाटणकर या लोकांनी पुढाकार घेऊन नवी संघटना बांधली. याच्यात लाखात व्यवहार करणारा कोणीही नसे, हजारात व्यवहार करणारे असे. हे छोटे व्यापारी शेवटी आपले कुटुंब चालवतात, गावाची अर्थव्यवस्था मजबूत करण्याला हातभार लावतात. म्हणून या छोट्या व्यापाऱ्यांची एक संघटना असावी या दृष्टीने स्वाभिमानी व्यापारी महासंघ ही संस्था आज या ठिकाणी उभी राहिली. संस्था स्थापन करण्यामध्ये ज्यांनी पुढाकार घेतला त्यांना एकच गोष्ट सांगायची आहे की हे लहान व्यावसायिक आहेत. त्यांच्या अडचणीत अधिक लक्ष घाला, जिथे त्यांच्या अडचणीसंबंधी सोडवायला तुम्हाला काही मर्यादा आल्या तर आम्हा लोकांना कॉन्टॅक्ट करा. आमची शक्ती व पाठिंबा हा छोट्यांच्या पाठीमागे राहील. मला बारामती व सबंध महाराष्ट्राचा छोटा-मोठा उद्योग, व्यापार, हा वाढवायचा आहे. हा वाढवणं याचा अर्थ आर्थिक दृष्ट्या राज्य समृद्धीच्या दिशेने जाणं. ते काम करायचं असेल तर आपल्याला प्रयत्न करावे लागतील. हे संघटन तुम्ही उभं केलं; आता निवडणुकीची प्रक्रिया आहे ती संपल्यानंतर पुन्हा एकदा आपण बसू, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी घडविले पारंपरिक संस्कृतीचे दर्शन

**भोर :** विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कला गुणांना वाव मिळावा तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात लोप पावत चाललेली आपली संस्कृती व परंपरेला उजाळा देण्यासाठी तसेच बदललेल्या काळातही पारंपरिक संस्कृतीचा जागर व्हावा यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाजारवाडी (ता.भोर) शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद यांच्या नियोजनाने वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मंगळवार (दि.१९) रोजी मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी अंगणवाडी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकार च्या वेशभूषा करुन हिंदी मराठी गाण्यांच्या तालावर ग्रामीण संस्कृतीचा जागर केला.



कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच रुपाली जाधव, उपसरपंच उत्तम खोपडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष स्वप्निल वाघ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रबोधन, देशभक्ती, शौर्य, कौटुंबिक, ऐतिहासिक अशा विविध प्रकारच्या हिंदी मराठी गाण्यांच्या तालावर ग्रामीण संस्कृतीच्या वारशाचे दर्शन घडवत पारंपारिक संस्कृतीचा जागर घडविल्याने ग्रामस्थांनकडून विद्यार्थ्यांसह, शिक्षकवृंद शालेय व्यवस्थापन समितीचे कौतुक करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष स्वप्निल वाघ, नीलम शिंदे,मुक्ता राऊत, कविता भागवत, मंगल धावले,रुपाली शिंदे, बाळू सपकाळ, संपत मानकर, संदीप धावले, योगेश गुरव,शंकर शिंदे, तुषार शिंदे, गोविंद खोपडे, चंद्रकांत भागवत, मारुती राऊत यांच्यसह पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय शिक्षक सुरेश खोपडे, सुदेश पाटील,भारती पिंगट, स्वाती चव्हाण, अंगणवाडी सेविका उज्वला चौधरी, मदतनीस कविता सपकाळ यांनी उत्कृष्ठ नियोजन व विशेष कष्ठ घेतले.

## मनसेचे तालुकाध्यक्ष रुपेश म्हाळसकर यांच्या स्टिंग ऑपरेशनंतर

# वडगाव नगरपंचायत प्रशासन खडबडून जागे

**वडगाव मावळ :** मावळ तालुक्याची राजधानी असलेल्या वडगाव नगरपंचायत कार्यालयाची सुरक्षा रात्रीची वाऱ्यावर असल्याचे मनसेचे तालुकाध्यक्ष रुपेश म्हाळसकर यांनी केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये उघड झाले आहे.



वडगाव शहरांचा कारभार पाहणारी नगरपंचायतची नुतून प्रशासकीय इमारतचे बांधकाम नुकतेच पूर्ण झाले असून त्या इमारतीत प्रशासकीय कामकाज सुरू आहे नुतन बांधण्यात आलेल्या या नगरपंचायत प्रशासकीय इमारत कार्यालयांत नागरिकांची सतत वर्दळ असते नगरपंचायत मालकीच्या वस्तू इत्यादी साहित्य नागरीकाची महत्वाची कागदपत्रे शासनाच्या मालमत्ता कर आदी कामांसाठी नागरीक येत असतात

या इमारतीतचे मुख्य प्रवेशद्वारा जवळ असणारे सुरक्षा रक्षक गेट दररोज बंद करणे नगरपंचायत प्रशासनाचे काम आहे मात्र याकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाल्याचे मनसेचे तालुकाध्यक्ष रुपेश म्हाळसकर यांनी निदर्शनास आणून दिले

या ठिकाणी एखादी चोरी शासनाचे मालमत्तेचे नुकसान झाल्यास याला जबाबदार कोण असा प्रश्न मनसेचे तालुकाध्यक्ष यांनी यावेळी उपस्थित केला आहे यातूनच नगरपंचायतीचा भोंगळ कारभार समोर आला आहे.

### स्टिंग ऑपरेशनमध्ये बाब उगड

**दोन दिवसांपूर्वी रात्री १२ वाजता मनसेचे तालुकाध्यक्ष रुपेश म्हाळसकर यांनी नगरपंचायत कार्यालयात जाऊन स्टिंग ऑपरेशन केले यावेळी नगरपंचायत इमारतीचे मुख्य प्रवेशद्वार उघडे होते तसेच मुख्य दरवाजाला फक्त कडी लावलेली होती कोणीही सहज रित्या कार्यालयात प्रवेश करता येईल अशी परिस्थिती त्या ठिकाणी पाहायला मिळाली.**

### नगरपंचायत प्रशासनान खडबडून जागे

**मनसेचे तालुकाध्यक्ष रुपेश म्हाळसकर यांनी हि गंभीर बाब वडगाव शहरातील नागरिकांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर नगरपंचायत प्रशासनाने तातडीने दखल घेऊन इमारतीच्या सुरक्षा बाबात अंमलबजावणी सुरू केल्याचे पाहायला मिळाले.**

# कोथुर्णे प्रकरणातील आरोपीला शिक्षा मिळाल्याने चिमुकलीला न्याय मिळाला

## पीडित कुटुंबाच्या पाठीशी शेवटपर्यंत राहू आमदार सुनील शेळकेंची ग्वाही



**वडगाव मावळ :** मावळ तालुक्यातील कोथुर्णे गावात सात वर्षीय चिमुकलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार करत खून केल्याची घटना २ ऑगस्ट २०२२ रोजी घडली होती या प्रकरणाची अंतिम सुनावणी आज (शुक्रवारी, दि. २२) शिवाजीनगर सत्र न्यायालयात पार पडली. यामध्ये न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली आहे पीडित मुलीला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला, याचे सर्व मावळवासीयांना मनापासून समाधान आहे. आरोपीने वरिष्ठ न्यायालयाकडे अपील केले तरी शिक्षा कायम राहावी, यासाठी आपण पीडित मुलीच्या कुटुंबाच्या पाठीशी शेवटपर्यंत राहू, अशी ग्वाही मावळचे आमदार सुनील शेळके यांनी दिली.

न्यायालयाच्या निकालावर प्रतिक्रिया देताना आमदार शेळके म्हणाले, कोथुर्णे येथील घटना ही अत्यंत निंदनीय व दुर्दैवी होती. संपूर्ण मावळ तालुक्यात या घटनेचे तीव्र पडसाद उमटले होते. पीडित मुलीला लवकर न्याय मिळावा यासाठी हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवण्याची मागणी समस्त मावळवासीयांच्या वतीने आपण केली होती. पोलीस खाते व राज्य सरकारनेही या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन न्यायालयात चांगली बाजू मांडली. त्यामुळे आरोपीला कडक शिक्षा झाली, याचे समाधान मला व मावळातील तमाम जनतेला, माता-भगिनींना आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे समाजातील अपप्रवृत्तींवर वचक बसेल व यापुढे मावळात अशा प्रकारची कोणतीही निंदनीय घटना घडणार नाही, असा विश्वास वाटतो. आरोपीने या निर्णयाविरुद्ध वरिष्ठ न्यायालयात दाद मागितली, तरी त्याची शिक्षा कमी होऊ नये, यासाठी आपण पीडितेच्या कुटुंबाला शेवटपर्यंत लागेल ते सहकार्य करणार आहोत, असेही शेळके म्हणाले. पीडित मुलीच्या कुटुंबाचे आर्थिक पुनर्वसन होण्यासाठी शासनाच्या माध्यमातून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी देखील आपण पाठपुरावा करणार आहोत, अशी माहितीही आमदार शेळके यांनी दिली.

# मोदी सरकार रडीचा डाव खेळत आहे : पृथ्वीराज चव्हाण यांचा हल्लाबोल

सक्तवसुली संचलनालय (इडी), केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानंतर (सीबीआय) आता प्राप्तिकर विभागाला हाताशी धरून मोदी सरकारने बँक खाती गोठवून काँग्रेसची आर्थिक कोंडी केली आहे. सरन्यायाधीशांना वगळून निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीचा कायदा बदलून मोदी सरकारने आपल्या मर्जीतील व्यक्तींची आयुक्तपदी नियुक्ती केली. अशा निवडणूक आयोगाकडून काय अपेक्षा करणार?, असा सवाल उपस्थित करून निवडणूक जिंकण्यासाठी मोदी सरकार रडीचा डाव खेळत असल्याचा हल्लाबोल माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शुक्रवारी केला. तसेच पुण्यातून रविंद्र धंगेकर विजयी होणार असल्याचा विसश्वासही त्यांनी व्यक्त केला.

काँग्रेस पक्षाच्या प्रचार प्रमुखपदी नियुक्ती झाल्यानंतर काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत पृथ्वीराज चव्हाण बोलत होते. पुणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार आमदार रवींद्र धंगेकर, शहराध्यक्ष अरविंद शिंदे, माजी आमदार मोहन जोशी, रमेश बागवे, अनंत गाडगीळ, दीप्ती चवधरी, माजी महापौर कमल व्यवहारे, वीरेंद्र किराड या वेळी उपस्थित होते.

देशातील प्राप्तिकर कायद्यानुसार कोणत्याही नोंदणीकृत पक्षाला प्राप्तिकर भरावा लागत नाही. पण, पक्षाला मिळालेल्या देणग्यांचा ताळेबंद आणि व्यवहार हे पक्षांना व्यवहार निवडणूक आयोगाला सादर करावे लागतात. २०१७-१८ मध्ये काँग्रेसला काही देणग्या मिळाल्या होत्या. केरळमधील पुराच्या घटननंतर पक्षाच्या सर्व खासदारांनी देशभरातून एक महिन्याचा निधी जमा करून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पाठविला होता. या गडबडीत पक्षाला मिळालेल्या देणग्यांची माहिती प्राप्तिकर विभागाला द्यायला आठवडाभर उशीर झाला. माहिती उशिरा दिल्याचा दंड दहा हजार रुपये आहे. मात्र, आता आठ वर्षांनी ही बाब कोदून काढत या विषयात आता पक्षाला नोटीस पाठवून २१० कोटी रुपयांचा दंड बजावला आहे.

हा दंड भरला नाही म्हणून विभागाने काँग्रेस पक्षाची चार बँकांतील ११ खाती गोठविली आहेत. आता दहा रुपयांचा व्यवहारही आम्हाला करता येणार नाही. विजयाचा आत्मविश्वास गमावलेले मोदी निवडणुकीत आमचा पराभव व्हावा म्हणून हे करत आहेत. ही कसली लोकशाही? असा संतप्त सवालही चव्हाण यांनी उपस्थित केला. सीताराम केसरी खजिनदार असतानाच्या काळात १९९४ मधील त्रुटीची नोटीस पक्षाला बजावण्यात आली आहे. आम्हाला न्याय मिळेल पण तोपर्यंत निवडणुका होऊन जातील त्याचे काय? असेही ते म्हणाले.

# ललना कला महोत्सवाचे दि. २७ मार्चपासून पाच दिवस आयोजन

**पुणे :** महिलांमधील गायन, नृत्य, संगीत, चित्रकला, कथाकथन, क्रीडा आदी कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या निवेदिता प्रतिष्ठानचे यंदाचे रौप्यमहोत्सवी २५वे वर्ष असून, त्यांच्यातर्फे आयोजित होणाऱ्या ङ्गललना कला महोत्सवाफ्चे यंदाचे ११वे वर्ष आहे. त्यानिमित्त यंदा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत बुधवार, दि. २७ ते रविवार, दि. ३१ मार्च २०२४ असे पाच दिवस गायन, नृत्य, पेण्टिंग, कथाकथन आणि पुरस्कार यांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन गुरुवार, दि. २८ मार्च रोजी सायंकाळी ५.०० वाजता खा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते पद्मावती येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन येथे संपन्न होईल. याप्रसंगी उद्योजिका डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील (अकलूज) आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नर्तक पं. डॉ. नंदकिशोर कपोते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. याप्रसंगी ङ्गतपस एल्डर केअर संस्थेफ्च्या संचालिका प्राजक्त वडावकर, ङ्गजस्ट फॉर हार्टफ संस्थेच्या संचालिका डॉ. मनीषा देवकर आणि रेडिओ सिटीच्या आरजे तेजू यांची विशेष उपस्थिती असेल. निवेदिता प्रतिष्ठानतर्फे याचे आयोजन करण्यात आले आहे, असे प्रतिष्ठानच्या अध्यक्ष अनुराधा भारती यांनी सांगितले.

याप्रसंगी ङ्गललना कलारत्नफ पुरस्कार सोहळा संपन्न होणार असून, त्यामध्ये ङ्गस्टार प्रवाहफ्फेम बालगायिका श्रुती भांडे (वय ९, अकोला), भरतनाट्यम् नृत्यांगना मिताली नाईक (गोवा), कथ्थक नृत्यांगना डॉ. नीलिमा हिरवे (पुणे), ङ्गइन लाइन फ्री स्टाइल स्केटिंगफ्मध्ये आशियाई चॅम्पियशिप पटकाविणाऱ्या श्रेयसी जोशी (वय १५, पुणे) व स्वराली जोशी (वय १७, पुणे) आणि प्रख्यात चित्रकार रुही अन्वर कुरेशी यांचा समारंभपूर्वक गौरव करण्यात येणार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९

Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

## क्राईम

### भांडणात मध्यस्थी करणारा जखमी

**सातारा :** येथील विठोबाचा नळ विठ्ठल मंदिराशेजारी दोघा भावंडांची भांडणे सुरु असताना भांडणे सोडवण्यासाठी आलेल्या तिसऱ्या जणाला चाकू  लागला. त्यात तो जखमी झाला. ही घटना दि. २० रोजी दुपारी १.३० च्या दरम्यान घडली. या प्रकरणी शाहूपुरी पोलीस ठाण्यात फळविक्रेता फिरोज राजू बागवान (वय ४२, मोरे कॉलनी, मूळ रा. दस्तगीर कॉलनी, सातारा) याने फिर्याद दिली असून, रहिमान राजू बागवान (रा. दस्तगीर कॉलनी, सातारा) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. ओठाच्या वरती चाकू लागल्याने रमजान युनुस बागवान हे जखमी झाले आहेत. पोलीस हवालदार बोडरे तपास करत आहेत.

### दुचाकी अपघातप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** आंबेदरे ते शाहूपुरी रस्त्यावर सोमेश्वर कॉलनी येथे एकाने दारु पिवून दुचाकी चालवत अपघात केला. ही घटना दि. १६ रोजी दुपारी २.३० वाजता घडली. या प्रकरणी करुणा प्रकाश ऊर्फ चंद्रकांत कोकरे (वय २५, रा. सोमेश्वर कॉलनी, शाहूपुरी) हिने शाहूपुरी पोलीस ठाण्यात तक्रारी दिली आहे. त्यानुसार दुचाकीस्वार मनिष मनोज जगताप (रा. केसरकर पेठ, सातारा) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. करुणाचे वडील प्रकाश ऊर्फ चंद्रकांत धोंडीराम कोकरे यांच्या पायाला दुचाकीची जोराची धडक बसून ते जखमी झाले. तसेच दुचाकी पडल्याने मनिष व त्याच्या पाठिमागे बसलेला ओंकार महेश कापसे (रा. केसरकर पेठ) हेही जखमी झाले आहेत. पोलीस हवालदार सणस तपास करत आहेत.

### बुधवार नाका येथून युवती बेपत्ता

**सातारा :** बुधवार नाका येथील कवारे कॉलनीतील राहत्या घरातून दि. २० रोजी सकाळी १ नंतर वाजता शाहजीया आरिफ मणेर (वय १९, रा. भुईंज, ता. वाई) ही बेपत्ता झाली आहे. या प्रकरणी अकबर अन्वर शेख (वय ३८, रा. बुधवार नाका) यांनी शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस हवालदार डमकले तपास करत आहेत.

### कामाठीपुऱ्यात विवाहितेची आत्महत्या

**सातारा :** कामाठीपुरा येथील राहत्या घरातील किचनमध्ये सौ. भारती प्रदीप मोरे (वय २९, रा. कामाठीपुरा) हिने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना दि. २० रोजी घडली. या प्रकरणी कुमार अंकुश जावळे (वय २८, रा. तासगाव, जि. सांगली) याने सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस हवालार पोळ तपास करत आहेत.

### साताऱ्यातून तिघेजण बेपत्ता

**सातारा :** येथील मंगळवार पेठेतील राहत्या घरातून दि. १८ रोजी सकाळी ८ ते १०.३० च्या सुमारास निकिता विठ्ठल ढेबे (वय २३) ही कोणास काहीही न सांगता निघून गेली आहेत. विठ्ठल गोविंद ढेबे (वय २७) याने शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस हवालदार डमकले तपास करत आहेत.अंगापूर तर्फ तारगाव, ता. सातारा येथील राहत्या घरातून पत्नी पल्लवी श्रीराम शेडगे (वय ३८) व मुलगा वरद श्रीराम शेडगे (वय ७) हे दोघेजण दि. १९ रोजी दुपारी १ च्या सुमारास बेपत्ता झाले आहेत. पोस्टातून पैसे घेवून येते, असे सांगून त्या गेल्याची फिर्याद श्रीराम पांडुरंग शेडगे (वय ४२) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे. पोलीस हवालदार पिसाळ तपास करत आहेत.

### दोन दुचाकींची चोरी

**सातारा :** कोडोली, ता. सातारा येथील काटे कॉलनीतील राहत्या घरासमोर दुचाकी (एमच ११ व्ही ५५७२) अज्ञाताने चोरुन नेली. दि. १५ रोजी रात्री १० ते दि. १६ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली. या प्रकरणी अनिरुध्द संजय गायकवाड यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस हवालदार शिंदे तपास करत आहेत.

आयटीआय कॉलेजसमोरील गंगा सागर कॉलनीत घरासमोर लावलेली दुचाकी (एमएच ११ सीयू ४५१८) अज्ञात चोरुन नेली. ही घटना दि. १८ रोजी रात्री ९ ते दि. १९ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घडली. राजेश धर्मेंद्र शर्मा (वय ३०, रा. गंगासागर कॉलनी, सातारा, मूळ. रा. बिहार) याने शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस हवालदार करपे तपास करत आहेत.

### तामजाईनगर येथे घरफोडी

**सातारा :** तामजाईनगर येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत ३ लाख ७० हजार रुपयांचे दागिने, रोख रक्कम लंपास केली. दि. १८ रोजी रात्री ११ नंतर ही घटना घडली. शरीफ मेहबूब शेख (वय ४९, रा. राजू खान सय्यद यांच्या घरी, तामजाईनगर, सातारा) यांनी शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक ढेरे तपास करत आहेत.

### शेततळ्याचा प्लास्टिक कागद चोरल्याप्रकरणी दोघांना अटक; एक फरार

**लोणंद :** तांबवे तालुका फलटण गावचे हद्दीत प्रवीण विक्रम शिंदे रा. तांबवे तालुका फलटण यांच्या शेतातून शेततळ्यावरील काळ्या रंगाचा प्लास्टिकचा कागद तिघेजण चोरून घेऊन जात असताना दोघाजणांना लोणंद पोलीस स्टेशनने ग्रामसुरक्षा दलाच्या साहाय्याने पकडले असून एक जण पळून जाण्यात यशस्वी झाला. लोणंद पोलीस स्टेशनमध्ये तिघांजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत लोणंद पोलीस स्टेशनवरून मिळालेली अधिक माहीती अशी, बुधवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास प्रशांत वसंत कुंभार, वय ३४ वर्ष रा.तांबवे ता.फलटण, दीपक रामदास माने, वय ३७ वर्ष रा. (ठोंबरे मळा) लोणंद ता खंडाळा व एक अनोळखी इसम यांनी तांबवे ता फलटण गावचे हद्दीत येरपट्टी नावाच्या शेतात प्रवीण शिंदे यांच्या शेततळ्यावरील पस्तीस हजार रुपये किंमतीचा काळ्या रंगाचा प्लास्टिकचा कागद मोटर सायकलवरून चोरून घेऊन जात असताना त्यांच्या कब्जात मिळून आला असून या घटनेची नोंद लोणंद पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे. दोघाजणांना लोणंद पोलिसांनी पकडले आहे तर पळून गेलेल्या इसमाचा शोध पोलीस घेत आहेत या घटनेचा अधिक तपास सिद्धेश्वर वाघमोडे हे करीत आहेत.

# शरद आयटीआयमधील १२५ विद्यार्थ्यांची निवड

**जयसिंगपूर :** यड्राव येथील सहकाररत्न शामरावजी पाटील यड्रावकर औद्योगिक प्रशिक्षण संस्था (शरद आयटीआय) येथे टाटा मोटर्स कंपनीचा पुल कॅम्पस इंटरव्यू झाला. यामध्ये सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील शासकिय व खासगी अशा ८ आयटीआय कॉलेजमधील १९२ विद्यार्थी सहभागी झाले होते, त्यामधील १२५ विद्यार्थ्यांची निवड झाली. यामध्ये शरद आयटीआयच्या ४४ विद्यार्थ्यांची निवड झाली. निवडलेल्या विद्यार्थ्यांना कंपनीकडून जॉईनिंग लेटर देण्यात आले.

शरद आयटीआयमध्ये टाटा मोटर्स कंपनीच्या या कॅम्पस इंटरव्ह्युमध्ये इलेक्ट्रीशन, फिटर, मोटर मेकॅनिकल, वेल्डर, टर्नर, मशिनिस्ट, पेंटर व शिटमेटल ट्रेडमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. कंपनीकडून विद्यार्थ्यांची कंपनीचे एचआर मॅनेजर गोवर्धन पांचाल यांच्यासह वैद्यकिय अधिकारी दशरथ पाटील, विवेक चव्हाण, सुशांत गिडये यांनी लेखी परिक्षा, मेडिकल चेकअप करुन विद्यार्थ्यांची निवड केली.

शरद आयटीआयने आतापर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याला नोकरी दिली आहे. त्याचबरोबर अनेक विद्यार्थ्यांना उद्योग उभारण्यासाठी प्रोत्सहान व सहकार्य केले आहे. तसेच कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नोकरी देण्यासाठी शरद आयटीआय अग्रेसर राहिले आहे.

# स्मॅकच्या महिला उद्योजकांसाठीच्या स्नेह मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद



**शिरोली :** शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर ( स्मॅक ) तर्फे आयोजित महिला उद्योजकांसाठीच्या स्नेह मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पाश्र्वभूमीवर स्मॅक भवनमध्ये शिरोली औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यरत महिला उद्योजकांसाठी स्नेह मेळावा झाला. महिला उद्योजकांची स्मॅक मध्ये सहभागीता व त्यांची ओळख होण्याच्या दृष्टीने हा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला.

स्मॅकचे अध्यक्ष सुरेन्द्र जैन, उपाध्यक्ष जयदीप चौगले व खाजानीस बदाम पाटील हे प्रमुख उपस्थित होते. सुरेन्द्र जैन यांनी स्मॅक, स्मॅक आयटीआय व स्मॅक क्लस्टरच्या माध्यमातून होर्णाय़ा विविध कामांची माहिती दिली. तसेच भविष्यात स्मॅकमध्ये सुशोभीकरण व लँडस्केपिंगचा मास्टर प्लॅन तयार करणे व आयटीआय मध्ये मुलींचा प्रवेश वाढवा व शिक्षणाच्या दृष्टीने विचार मांडले. महिन्यातून एकदा स्मॅकभवन मध्ये महिला उद्योजकांनी एकत्रित बैठक आयोजित करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. स्मॅक भवनमध्ये महिला व अन्य विषयक सेमिनार व कार्यशाळा आयोजित करण्याकरिता श्री. जैन यांनी आवाहन केले.

स्नेहमेळाव्यास ग्रॅट फौंड्रीच्या संचालिका सौ. आशा जैन, व्हर्साटाईल इंडस्ट्रीजच्या संचालिका श्रीमती बिना जनवाडकर, व्हर्साटाईल इंजिनीअर्सच्या सौ. अमृता जनवाडकर, श्रीराम फाउंड्रीच्या कार्यकारी संचालिका सौ. जिया झंवर व सौ. अंकिता झंवर, यश मेटॅलिक्सच्या कार्यकारी संचालिका सौ. राजसी जाधव-सप्रे, सप्रे प्रिसिजनच्या भागीदार सौ. रेणुका सप्रे, सिनर्जी ग्रीनच्या कु. श्रेया शिरगावकर, पायोनियर मशीन्सच्या प्रोप्रायटर श्रीमती दीपा पत्रावळी, राठोड ज्वेलर्सच्या कु. रीवा राठोड, क्युरा टेकच्या सौ. कृष्णा जाधव, कनेरी इंडस्ट्रीजच्या सौ. संयोगिता पाटील, धवल इंजिनिअरिंगच्या सौ. मित्रा किर्लोस्कर व सुपर-सील इंडस्ट्रीजच्या सौ. शीतल नित्सुरे उपस्थित होत्या.

# ज्येष्ठ नेते शरद पवार यांची साताऱ्यातून उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता ?

**मुंबई :** महाविकास आघाडीचे प्रणेते व मनापासून भारतीय जनता पक्षाचे सरकार उलटवून टाकण्याची प्रामाणिकपणे भूमिका घेणारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनीच सातारा लोकसभा मतदारसंघातील निवडणूक महा विकास आघाडी कडून लढवावी. अशी मागणी आता जोर धरू लागलेली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेब यांचे नाव अधिकृत उमेदवार म्हणून पुढे येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. अद्याप त्याला दुजोरा मिळालेल नाही हेही तितकच खरे आहे. श्री पवार साहेब यांनी निवडणूक न लढवण्याचे सांगितले पण त्यांचा शब्द राजकारणामध्ये वेगळ्या दिशेला जाऊन पोहोचतो.



**ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेब यांचे व श्रीनिवास पाटील यांच्या वयामध्ये फक्त एक वर्षाचे अंतर आहे. श्री पवार साहेब यांची उमेदवारी जाहीर झाली तर विधानसभेची इच्छुक उमेदवार व सामान्य कार्यकर्ते हे स्पीडने प्रचार करतील आणि त्याचाही निश्चित फायदा होईल असे मानण्यात येत आहे शेवटी राजकारणात काही घडू शकते. तो धागा पकडून अशी चर्चा होत आहे.**

सातारा लोकसभा मतदारसंघाच्या २०१९ साली झालेल्या सातारा लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत सातारा एकूण १८ लाख ५० हजार ३९३ मतदार होते. त्यापैकी १२ लाख ३९ हजार ५४८ मतदारांनी मतदान केले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्रीनिवास पाटील यांना ६,३६,६२० तर भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले यांना पाच लाख ४८ हजार९०३ मतं पडली होती. वंचित बहुजन आघाडीचे चंद्रकांत खंडाईत यांना १७,२०३ व शिवाजी भोसले४६४३ अलंकृता बिचुकले आवाडे १७४५ ड शिवाजी जाधव२६,४०७ वेंकटेश महास्वामी १५७७ अशा मताची आकडेवारी झाली होती. त्यानंतर सध्या २०२४ साली होणाऱ्या सातारा लोकसभा मतदारसंघांमध्ये राजकीय दृष्ट्या एकामेकांचे मित्र बनलेले आहेत तर काही मित्र हे राजकीय शत्रू बनलेले आहेत.

या सर्व घडामोडी मध्ये कोणताही अंदाज व्यक्त करणे योग्य ठरू शकत नाही .अशा पद्धतीने राजकारणाची खेळी खेळली जात आहे. महाविकास आघाडीची स्थानिक पातळीवर चर्चा होताना दिसत आहे आणि ही चर्चा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात होत असून प्रत्येक घटक पक्षाचे प्रमुख प्रतिनिधी पेक्षा एक दोन प्रतिनिधी येत आहेत .समविचारी पक्षातील बहुतांश लोक हे गेले पाच वर्षे रस्त्यावरच्या आंदोलन करतात. पण, त्यांना साथ मिळत नाही. आता याच पक्षाच्या कार्यकर्त्यांना प्रचाराची मोठी जबाबदारी पेलताना अवघडल्यासारखं वाटणार आहे. कारण त्यांच्या कार्यकाळामध्ये ज्यांच्या विरोधात आंदोलन केले. त्यांच्याच आता प्रचार करण्याची वेळ आलेली आहे. असं मानण्यात येत आहे तर दुसऱ्या बाजूला महायुतीमध्ये आता आकडतांडव सुरू झालेले आहे.

छत्रपती उदयनराजे भोसले यांना उमेदवारी मिळावी .यासाठी त्यांच्या सल्लागारांनी शिवराज चौहन , अजयकुमार मिश्रा, गिरीश महाजन पंकजा मुंडे तसेच देवेंद्र फडणवीस एकनाथ शिंदे अशा अनेक राजकारणातील मातब्बर मंडळींना छत्रपती उदयनराजे भोसले यांचे निवासस्थान असलेल्या जल मंदिरात आणून श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचे राजकीय वजन वाढवण्याचा प्रयत्न केला. गेले दोन आठवडे झाले उमेदवारी जाहीर होत नसल्याने सध्या त्यांच्याबद्दल वाटणारी आत्मीयता आता वेगळ्या विषयाकडे वळलेली आहे. उशिरा मिळालेल्या न्याय हा कधीकधी अन्याय ठरतो. तशा पद्धतीने आता श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्यावर भाजप अन्याय करत असल्याची भावना त्यांच्या ठराविक समर्थकांना वाटत आहे.

दुसऱ्या बाजूला भाजपच्या निष्ठावंतांना विचारात घेऊनच महायुतीची उमेदवारी जाहीर करावी. असा एक ओळीचा आग्रह आहे. त्यामध्ये बऱ्याच गोष्टी आलेले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाकडे प्रबळ दावेदार नसल्यामुळे खऱ्या अर्थाने अजित दादा पवार गट व भाजप या दोघांपैकी कोणत्या तरी एका समर्थकाला उमेदवारी मिळेल. पण महाविकास आघाडीतून ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेब यांनी जर निवडणुकीत उमेदवारी स्वीकारली तर विरोधकांना किंवा राजकीय विरोधकांना जड जाईल.

# निष्ठावंतांना न्याय मिळत नसेल तर न्याय यात्रेला काय अर्थ?

**पुणे :** एकीकडे काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी हे न्याय यात्रा काढत आहेत मात्र दुसरीकडे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमध्ये निष्ठावंतावर अन्याय करण्याचे सत्र सुरू झाले आहे. मग न्याय कुणाकडे मागायचा, हा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे, त्याहीपेक्षा काँग्रेसच्या धोरणाची पायमल्ली राज्यात कोण करत आहे, असा थेट सवाल पुणे लोकसभेसाठी प्रबळ दावेदार असणारे माजी उपमहापौर आबा बागुल यांनी पत्रकार परिषदेत केला.शिवाय कार्यकर्ते, मतदारांशी चर्चा करून पुढील भूमिका घेणार असल्याचेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

आबा बागुल म्हणाले की, गेली चाळीस वर्षे मी काँग्रेस पक्षाचा निष्ठावंत आहे. यंदाच्या लोकसभेसाठी मी प्रबळ दावेदार असताना प्रदेश काँग्रेसने कोणत्या निकषावर मला उमेदवारी नाकारली, याचा खुलासा झाला पाहिजे, अशी मागणी ही बाबुल यांनी केली.

दुसऱ्या पक्षातून येवून जेमतेम दीड वर्षे होत नाही ते आमदार झाले. मात्र, त्यांना आता पुन्हा लोकसभेसाठी उमेदवारी देणे म्हणजे निष्ठावंत लोकांवर अन्याय करण्यासारखेच आहे. एकप्रकारे ही निष्ठेची हत्या आहे. पक्षात माझ्यासह अनेक जण निवडून येण्याची क्षमता असणारे आहेत. मग त्यांना डावलून परस्पर उमेदवारी जाहीर करणे हेच मुळात खेदजनक आहे, अशी भावना बागुल यांनी व्यक्त केली.

वास्तविक यंदा पक्षाचे राष्ट्रीय पातळीवर उमेदवारी देण्यासंदर्भात धोरण ठरले आहे. त्यानुसार एक व्यक्ती एक पद हे पाहता विद्यमान आमदारांना उमेदवारी परस्पर कशी दिली गेली? जे यापूर्वी लोकसभा अथवा विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेले आहेत आणि जे विद्यमान आमदार आहेत त्यांना उमेदवारी देता येणार नाही, हे पक्षाचे धोरण आहे. या धोरणाची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने पायमल्ली केली आहे, याकडेही आबा बागुल यांनी लक्ष वेधले. ज्यांनी दुसऱ्या पक्षात असताना काँग्रेस नेतृत्वावर खालच्या पातळीवर टीका केली, त्यांच्यासमवेत असलेल्यांचे क्लिप उद्या व्हायरल झाल्यास त्यावर प्रदेश काँग्रेसची कोणती भूमिका राहील, असा सवाल करून आबा बागुल म्हणाले, ज्यांनी अनेक वर्षे पक्षासाठी काम केले त्या निष्ठावंतांना हा धक्का आहे. त्यामुळे आम्ही निष्ठावंताची बैठक घेवून पुढील भूमिका जाहीर करणार आहोत. निष्ठेचा विचार करा आणि गटातटाचे राजकारण बंद करा, हेच मी सर्व नेत्यांना सांगत आहे. अजूनही पक्षाने माझा विचार करावा, अशी मागणी करतानाच लवकरच पुढील दिशा स्पष्ट केली जाईल, असेही ते म्हणाले.

# आमदार जयकुमार गोरेंनी पाणी प्रश्नावर केली खुली चर्चा

## औंध येथे पाणी संघर्ष समितीनं केलं पाणी पे चर्चा कार्यक्रमाचं आयोजन!



**वडूज :** औंध सह वंचित २० गावांसाठी येत्या तीन वर्षात हक्काचं पाणी मिळवून देणार असल्याचं ठोस आश्वासन आमदार जयकुमार गोरेंनी औंध येथील शेतकरी मेळाव्यात बोलताना जनतेला दिलं. कण्हेर धरणातुन पाणी उचलण्याची ही उपसा जलसिंचन योजना मागील अनेक वर्षांपासून रखडलेली आहे.या वंचित गावांना पाणी मिळावं याबाबत शेतकरी व सामाजिक संस्था आदींनी आजवर अनेक आंदोलने केली. आता या योजनेच्या पाठ पुराव्या साठी पाणी संघर्ष समिती स्थापन झाली आहे. या समितीच्या माध्यमातून करण्यात आलेल्या आंदोलनाला पत्रकार बंधूनी जोमाने साथ दिल्याने खऱ्या अर्थाने योजनेला मोठी गती मिळाली. या योजनेसाठी भरीव निधीची गरज आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खऱ्या अर्थाने या योजनेसाठी विशेष लक्ष देवून मान्यता दिली. सर्व त्रुटी दूर झाल्यावर ही योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल. यासाठी काही अवधी लागणार असून येत्या ३ वर्षात ही योजना पूर्ण होवून औंधसह वंचित २० गावांना हक्काचं पाणी मिळेल असा विश्वास आमदार जयकुमार गोरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिला.

औंध ता खटाव येथे पाणी संघर्ष समितीच्या वतीने औंधसह वंचित २० गावांची पाणी परिषद अर्थात पाणी पे चर्चा या विषयावर २० गावांच्या शेतकरी व जनतेचा उपस्थितीत आयोजित मेळाव्यात आ. गोरे बोलत होते.

यावेळी परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी आ. गोरे यांना पाणी प्रश्नावर विविध प्रश्न विचारले. सर्वांसाठी खुल्या मैदानात चर्चा आयोजित केल्याने आ गोरेंनी सर्व जनतेसमोर उत्तरे देवून शेतकऱ्यांचा योजनेबाबत असलेला संभ्रम दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.काही अपवाद वगळता अनेकांना या योजनेची परिपूर्ण माहिती नसल्याने प्रश्न सुद्धा नीट विचारता आले नाहीत. आचार संहितेच्या पार्श्वभूमीवर कोणतीही राजकीय चर्चा न करता फक्त पाण्यावर चर्चा करण्यात आली.

येथील जनतेला विश्वस्त करण्यात आ गोरे मात्र यशस्वी ठरले.माजी आमदार डॉ दिलीपराव येळगावकरानी त्यांच्या पाणी संघर्ष चळवळीचा उजाळा देत आ गोरेंचं या भागाला पाणी देवू शकतात असं सुतोवाच केलं.

पाणी संघर्ष समितीचे अध्यक्ष पैलवान संतोष मांडवे , उपाध्यक्ष धनाजी आमले (मेजर), यांनी प्रास्ताविकात मनोगतं व्यक्त केली.

या पाणी परिषदेस सोमनाथ भोसले, वर्धन ॲग्रोचे संचालक विक्रम (बाबा) कदम, धनंजय चव्हाण, विशाल बागल, काका बनसोडे, वडूजचे सर्व भाजप नगरसेवक, विक्रम रोमण, राजाबापू देशमुख, नवलशेठ थोरात, हनमंतराव चव्हाण, वसंत पवार, सूर्यभान जाधव, तानाजी देशमुख, चंद्रकांत पवार, सागर जगदाळे, लालासाहेब माने, बाळू ताठे, सत्यवान पाटोळे, हनमंतराव सुतार, अनिल दुर्गाळे, प्रदिप गुजर, नितीन जाधव, निखिल राजपूत, रवींद्र शिंदे, सचिन सूर्यवंशी, डॉ. विवेक देशमुख, आलिम मोदी, तानाजी देशमुख, भरतशेठ जाधव, बाळासाहेब झेंडे, संदिप गुरव, औंधसह २० गावचे नागरिक व पत्रकार बांधव, उपस्थित होते.

# मानवी हक्कासंबंधी न्या.पी.एन.भगवती आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट कॉम्पिटिशनचे उदघाटन

## भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेजमध्ये आयोजन

**पुणे :** भारती विद्यापीठाच्या न्यू लॉ कॉलेज द्वारे आयोजित मानवी हक्क या विषयावरील मन्या.पी.एन.भगवती आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट कॉम्पिटिशनफ चे उदघाटन दि.२१ मार्च रोजी झाले. श्रीलंकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्या.एस.थुराईराज,अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाचे न्या.ए.आर.मसूदी, भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विवेक सावजी, कुलसचिव जी.जयकुमार, भारती विद्यापीठ विधी शाखेच्या अधिष्ठाता आणि न्यू लॉ कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य डॉ.उज्वला बेंडाळे हे मान्यवर उदघाटन समारंभासाठी उपस्थित होते.प्राचार्य डॉ. उज्वला बेंडाळे,प्रा.शिवांगी सिन्हा यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.




न्या.पी.एन.भगवती आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट कॉम्पिटिशनफ उदघाटन प्रसंगी डावीकडून डॉ. उज्वला बेंडाळे,कुलगुरू डॉ.विवेक सावजी,न्या.एस.थुराईराज,न्या.ए.आर.मसूदी,कुलसचिव जी.जयकुमार,भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्या.एच.एल.गोखले

या स्पर्धेत ५० स्पर्धक संघानी सहभाग घेतला आहे. दि.२३ मार्च रोजी समारोप होईल.समारोप कार्यक्रमास भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्या.अभय ओक,नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्या.अनिलकुमार सिन्हा,मालदीवच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्या. हूनसु अल सुऊद, अलाहाबाद न्यायालयाचे न्या.अरुम कुमार सिंग देशवाल,केरळ उच्च न्यायालयाचे न्या. सोफी थॉमस,गुजरात उच्च न्यायालयाचे न्या.अनिरुद्ध पी.मायी उपस्थित राहणार आहेत.न्या.पी.एन.भगवती आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट कॉम्पिटिशनफ चे हे बारावे वर्ष असून भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्या. पी.एन.भगवती यांच्या योगदानाच्या स्मरणार्थ २०११ साली सुरु करण्यात आली. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर ही स्पर्धा नावाजली आहे.मानवी हक्कांच्या संदर्भातील राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय कायद्यांबद्दल या स्पर्धेतून जागृती घडवून आणली जाते.भारती विद्यापीठाचे संस्थापक कै.डॉ. पतंगराव कदम,कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ.विश्वजित कदम, कार्यकारी संचालक डॉ.अस्मिता कदम-जगताप, कुलगुरू डॉ. विवेक सावजी यांचे मार्गदर्शन या स्पर्धेला लाभले. मानवी हक्कांच्या विस्तारात आणि संरक्षणात न्यायालयानी महत्वाची भूमिका बजावली असून भारताची त्यासंबंधी भूमिका अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर महत्वपूर्ण ठरली आहे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार हे मानवी हक्कांच्या जपणुकीचे महत्वपूर्ण उदाहरण असून सर्वोच्च न्यायालयाने त्यासंबंधी वेळोवेळी सकारात्मक आणि संरक्षक भूमिका घेतली आहे. तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रगतीने काही वेळा मानवी हक्कांवर गदा येत असल्याचे चित्र दिसत असून आर्टिफिशियल इंटेलिजन्स, फेशल रेकग्निशन, बायोमेट्रिक माहितीचे अनधिकृत हस्तांतरण, सोशल मीडिया माध्यमातून होणारे शोषण यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. देखरेख ठेवणे, खासगी अधिकारांवर गदा आणणे, भेदभाव करणे दिसून येत आहे. त्याबाबत सर्वोच्च न्यायालय लक्ष ठेवून आहे. आणि मानवी अधिकारांचे उल्लंघन होणार नाही यासाठी दक्ष आहे. असा सूर उदघाटन कार्यक्रमातील मान्यवरांच्या भाषणात उमटला.

# सोनी मराठी वाहिनीवर पहिल्यांदाच होणार रंगपंचमी महासंगम

**कोल्हापूर :** सोनी मराठी वाहिनी प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी नेहमी नवनवीन कार्यक्रम घेऊन येत असते. नवीन मालिका, नवे महाएपिसोड, मोठ्या प्रमाणावर साजरे केले जाणारे सण हे सगळं सोनी मराठी वाहिनी नेहमीच प्रेक्षकांसाठी घेऊन येत असते. आता लवकरच होळी आणि रंगपंचमी येणार आहेत. त्याची सर्वत्र धूम आहेच, पण होळी आणि रंगपंचमी यांचे निमित्त साधून सोनी मराठीदेखील प्रेक्षकांसाठी विशेष असं काही घेऊन येणार आहे. सोनी मराठी वाहिनीवर रंगपंचमी महासंगम पहिल्यांदाच होणार आहे. महासंगम म्हणजेच सोनी मराठीवरील सगळ्यांच मालिकांतील



प्रेक्षकांना आवडणार्या व्यक्तिरेखा आपल्याला एकत्र पाहायला मिळणार आहेत. सोनी मराठीवर पहिल्यांदाच एवढा मोठा महासंगम पाहायला मिळणार आहे. नेहमी निरनिराळ्या मालिकांतून प्रेक्षकांचं मनोरंजन करणार्या, प्रेक्षकांना आवडणार्या ह्या व्यक्तिरेखा रंगपंचमीसाठी एकत्र येऊन किती मजा करताहेत, हे आपल्याला येत्या सोमवारी म्हणजेच २५ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता पाहता येणार आहे.

अबोल प्रीतीची अजब कहाणी मालिकेतील सराफ परिवाराने सोनी मराठीवरील या सगळ्या व्यक्तिरेखांना आपल्या घरी होळी पार्टीनिमित्त एकत्र बोलावले आहे. यामिनी सराफ यांनी या सगळ्याचं आयोजन केलं असून राजवीर आणि मयूरी हे या सगळ्या पाहुण्यांचं आदरातिथ्य करणार आहेत. या पार्टीमध्ये मवीरू आणि प्राजक्ता, ममीरा आणि मल्हार, बयो आणि डॉ. विशाल, मयशोधन आणि असीमम हे सगळे कलाकार एकत्र दिसणार आहेत. या रंगपंचमी पार्टीमधील प्रमुख बाब म्हणजे या कलाकारांचे पेहेराव. सगळ्या जोड्या वेगवेगळ्या रंगांचं प्रतिनिधित्व करणार आहेत. रंगपंचमी म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर निरनिराळे रंग दिसतात. तशाच निरनिराळ्या रांगांमध्ये हे कलाकार आपल्याला दिसतील. शिवाय या महासंगममध्ये या प्रत्येक कलाकाराचे विशेष असे नृत्य सादरीकरण प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. होळी विशेष आणि प्रेक्षकांना आवडणार्या निरनिराळ्या गाण्यांवर हे कलाकार थिरकताना दिसणार आहेत.

# डॉ. विजय भटकर यांना २०२४ चा पुण्यभूषण पुरस्कार जाहीर



**पुणे :** ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर यांना संगणकशास्त्र क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल २०२४ चा पुण्यभूषण पुरस्कार आज जाहीर झाला आहे. पुण्यभूषण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे आज ही घोषणा केली. डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीनं यंदाचे पुरस्कार्थी निश्चित केले आहे. यावेळी सीमेवर लढताना जखमी झालेल्या जवानांना आणि वीरमातेलाही गौरविण्यात येणार असल्याची माहिती देसाई यांनी यावेळी दिली.

पुरस्काराचे यंदाचे ३६ वे वर्ष आहे. सलग ३५ वर्षे संस्थेने, संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशात आणि देशाच्या बाहेरही ह्या प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्काराचा भव्य उपक्रम राबविला. आहे बालशिवाजींची, सोन्याच्या फाळाने पुण्याची भूमी नांगरत असलेली प्रतिकृती, या नगरीच्या ग्रामदैवतांसह वैशिष्ट्यपूर्ण अशा या पुण्यभूषण पुरस्काराच्या स्मृतीचिन्हात आहे. पुरस्काराच्या रक्कमेत या वर्षी पासून वाढ करण्यात आली असून रू १,००,०००( रुपये एक लाख) वरून ती रु. २,००,००० (रुपये दोन लक्ष) करण्यात आली आहे .पुरस्कार रकमेचा धनादेश पुरस्कार्थी डॉ. विजय भटकर यांना देण्यात येईल.

पुण्यभूषण पुरस्कार प्रदान समारंभ जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या दिमाखदार सोहळ्यात करण्यात येईल.

महामहिम राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, उपराष्ट्रपती हमीद अन्सारी, व्यंकय्या नायडू, माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, लोकसभेचे माजी सभापती सोमनाथ चटर्जी, मनोहर जोशी, ज्येष्ठ नेते शरद पवार, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, क्रिकेटपटू कपिल देव व सचिन तेंडूलकर, पांडुरंगशास्त्री आठवले, विलासराव देशमुख, ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार, वसंतराव साठे, नानासाहेब गोरे, तत्कालीन राज्यपाल सी. सुब्रह्मण्यम्, मधु दंडवते, दि हिंदूचे संपादक एन. राम, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, सुशिलकुमार शिंदे, सिताराम येचुरी, गिरीश कर्नाड, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा, महेश एलकुंचवार, पृथ्वीराज चव्हाण, डॉ. विकास आमटे, आशा भोसले, नारायणमूर्थी, शरद यादव, नितीन गडकरी, पं.हरिप्रसाद चौरसिया, पं. अमदजअली खान व पं. शिवकुमार शर्मा, प्रफुल्ल पटेल, ज्येष्ठ अभिनेत्री शर्मिला टागोर आणि ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर आदी मान्यवरांनी पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करून नामांकित पुणेकरांचा यथोचित सन्मान केला आहे.

# पक्षात राहून विरोधी प्रचार चालणार नाही, पदाचा राजीनामा द्यावा लागेल

## मंत्री चंद्रकांत पाटील यांची सक्त ताकीद



**भोगावती :** लोकसभा निवडणुकीसाठी प्रत्येक नावाची घोषणा ही फक्त दिल्लीवरूनच केली जाईल. नाव कोणाचे आहे, हे महत्वाचे नसून आपला उमेदवार देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. समजून कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन करत ज्यांना विरोधी प्रचार करावयाचा आहे. त्यांनी पहिला पक्षाचा राजीनामा ठेवावा आणि मगच विरोधात काम करावे, अशी सक्त ताकीद राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली आहे.

राधानगरी तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती रविश उदयसिंह पाटील कौलवकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्या शेतकरी व युवक मेळाव्याच्या अध्यक्षपदावरून बोलत होते.

मंत्री पाटील पुढे म्हणाले, राज्यातील उमेदवारांची निवड मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडून केली जाईल. जे पंतप्रधान पदासाठी नरेंद्र मोदींचे हात बळकट करतील त्यांनाच या निवडणुकीत संधी देतील. उमेदवार कोण आहे, चिन्ह कोणते आहे. यापेक्षा पुन्हा तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांनाच पंतप्रधान पदावर विराजमान करावयाचे आहे. या ध्येयाने काम करा, असे आवाहन केले.

खासदार धनंजय महाडिक म्हणाले, काँग्रेसवाल्यांच्याकडून एवढ्या छोट्या कार्यकर्त्यांच्या प्रवेशासाठी एवढे मोठे व्यासपीठ केले. म्हणून खिल्ली उडवली जात आहे. मात्र रविश पाटील हे छोटा पॅकेट मे बडा धमाका आहेत, भाजपचे काम करण्यासाठी संधी दिली जाते. वर्षानुवर्षी गरिबी हटाव हा एकच नारा घेऊन राहुल गांधी आज देखील भारत जोडो यात्रा करत आहेत. एकीकडे उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असताना काँग्रेसचा हा नेता भटकत आहे. अशा दिशाहीन झालेल्या काँग्रेसला कंटाळून तरुण मोठ्या प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करत आहेत. जिल्हा नियोजन मंडळाच्यामार्फत कधी एवढा निधी जिल्ह्याला मिळाला नाही, तो मिळाला असून विमानतळ, रेल्वे स्टेशन यांचा चेहरामोहरा बदलला.

रविश पाटील म्हणाले, गेल्या तीन पिढ्यांच्यापासून आम्ही काँग्रेसमध्ये झोकून काम केले. मात्र सातत्याने आमचे खच्चीकरण करण्यासाठी प्रयत्न केले. गोकुळ दूध संघ, भोगावती साखर कारखाना निवडणुकीत तर आमच्यासोबत उघड विश्वासघात केला. अशा विश्वासघातकी प्रवृत्ती सोबत राहण्यापेक्षा स्वाभिमानाने राहणे पसंत करीन, ही भाजपची विचारसरणी पटली म्हणून जाहीर प्रवेश करत आहे.

डॉ. सुभाष जाधव यांनी स्वागत तर नाथाजी पाटील यांनी प्रास्ताविक केले. माजी जिल्हा अध्यक्ष समरजीत घाटगे, बिद्रीचे संचालक राहुल देसाई यांची भाषणे झाली. लहू जरग, राहुल चिकोडे, माजी आमदार भरमूअण्णा पाटील, संभाजी आरडे, राधानगरी तालुका अध्यक्ष विलास रणदिवे, महिला तालुकाध्यक्ष सविता पाटील, ऋतुजा पाटील, करवीर तालुका अध्यक्ष दत्तात्रय मेडशिंगे, हंबीरराव पाटील आदी उपस्थित होते. दीपक शिरगावकर यांनी आभार मानले.

# ड्रेस कोडचा निर्णय रद्द करा

## शिक्षक परिषदेची मागणी; मुख्यमंत्र्यांना निवेदन



**अहमदनगर :** शिक्षण व्यवस्थेतील अन्यायकारक संच मान्यतेचा शासन निर्णय दुरुस्त करावा, ड्रेस कोडबाबतचा शासन निर्णय रद्द करा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन मुंबई विभागाचे अध्यक्ष सुहास हिर्लेकर, कार्यवाह शिवनाथ दराडे, कोषाध्यक्ष गणेश नाकती यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांना दिले असल्याची माहिती शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

बोडखे म्हणाले की, १५ मार्च रोजी विद्यार्थी व शिक्षकांचे प्रमाण निश्चित करणारा संच मान्यतेचा नवा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. या शासन

निर्णयानुसार अनुदानित शाळांमधील हजारो शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत, तसेच विशेष शिक्षकांविषयी तरतुदीवरही शिक्षकांनी आक्षेप घेतलेले आहेत.

शिक्षक परिषदेच्या वतीने जुन्या संच मान्यतेच्या निकषांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी अनेक वेळा निवेदने देण्यात आलेली आहेत.

जुन्या संच मान्यतेच्या निकषांमध्ये ही दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे, तसेच शिक्षकांना ड्रेस कोड संहिता लावणे म्हणजे व्यक्ती स्वातंत्र्याला बाधा पोहोचवणारी गोष्ट आहे. ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांचा पेहराव सर्वत्रच योग्य पद्धतीने आहे. शिक्षकांच्या पेहरावाच्या तक्रारी आलेल्या नाहीत. त्यामुळे ड्रेस कोडबाबत सक्ती करू नये, असे निवेदनात म्हटले आहे.

# अपहरण खून प्रकरणी आरोपीला फाशीची शिक्षा

**वडगाव मावळ :** मावळ तालुक्यातील कोथुर्णे गावात सात वर्षीय चिमुकलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार करत खून केल्याची घटना २ ऑगस्ट २०२२ रोजी घडली. या प्रकरणाची अंतिम सुनावणी आज (शुक्रवारी, दि. २२) शिवाजीनगर सत्र न्यायालयात पार पडली. यामध्ये न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली आहे. तर त्याच्या आईला सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

तेजस ऊर्फ दादा महिपती दळवी (रा. कोथुर्णे) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

मावळ तालुक्यातील कोथुर्णे येथील सात वर्षांच्या मुलीचे २ऑगस्ट २०२२ रोजी अपहरण करून, तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या हृदयद्रावक घटनेनंतर कामशेत पोलिसांनी तपासाची सूत्रे फिरवत अवघ्या २४ तासाच्या आत आरोपी तेजस दळवीला अटक केली होती.

या प्रकरणाची सुनावणी शिवाजीनगर येथील जिल्हा सत्र न्यायालयात सुरू होती. आज अंतिम सुनावणी होऊन आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. मन सुन्न करणाऱ्या या घटनेमुळे संपूर्ण तालुक्याचे या सुनावणीकडे लक्ष लागले होते.तेजस दळवी याच्या आईचा देखील या गुन्ह्यात सहभाग आढळला होता. खुनाच्या गुन्ह्याचे पुरावे नष्ट करण्याचा तिने प्रयत्न केला होता. त्याबाबत तिला सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

# नैसर्गिक पाणीसाठा कमी झाल्याने वन्यजीवांच्या अस्तित्वाचा प्रश्न

**कोल्हापूर :** जंगलतोड, खाणकाम, पीक पद्धतीतील मोठे बदल, दुष्काळ, सर्वसाधारणपणे कोरडे पडणे, पाण्याच्या गुणवत्तेचा ऱ्हास, भूजल शोषून घेणे या सर्व प्रक्रियांचा वन्यजीव क्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे. दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत आहे. जंगलातील पाण्याचे स्रोत आटल्याने पश्चिम घाटातील काही ठिकाणी वन्यजीवांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी खासगी स्वयंसेवी संस्थेची मदत घेतल्यास उन्हाळ्यात वन्यजीवांसाठी तहान भागण्यास मदत होणार आहे.



पश्चिम घाटातील राधानगरी, भुदरगड, शाहूवाडी, पन्हाळा, गगनबावडा, आजरा, चंदगड या तालुक्यांत घनदाट जंगल आहे. वन्यजीवांच्या अस्तित्वाच्या खुणा जंगल परिसरात आहेत. अशा वन्यजीवांच्या संवर्धनाचा भाग म्हणून वन विभागातर्फे जंगली भागात कृत्रिम वनतळी तयार केली जातात. कोल्हापूर वन्यजीव क्षेत्रात चार तलाव, तळी आहेत. नैसर्गिक पाण्याचे जवळपास ५० स्रोत आहेत. बारमाही ३६ आणि हंगामी १७ तळी आहेत. बारमाही १९ आणि हंगामी ८ अशी कृत्रिम वनतळी तयार केलेली आहेत. याशिवाय मोठे ५४ नाले या क्षेत्रात वाहतात.

वन विभागाने पूर्वी जंगलातील वनतळी पुनरुज्जीवित करण्यास प्राधान्य दिले आहे. वास्तविक गेल्या काही वर्षांत पश्चिम घाटात साडेतीनशेहून अधिक वनतळी (पाणवठे) बांधली आहेत. त्यांपैकी निम्म्याहून अधिक तळ्यांतील पाण्याची पातळी कायम आहे; मात्र आता निम्मी तळी कोरडी पडली असून त्यांची स्वच्छता करून पुन्हा पाणवठे तयार करण्याचे आव्हान आहे. ज्या वनतळ्यांत सध्या पाणीसाठा आहे, आणि पावसाळ्याचे पाणी डिसेंबरअखेरपर्यंत टिकून राहते, तेथे उन्हाची तीव्रता वाढल्यानंतर पाणी पूर्णतः संपून जाते. अशा वनतळ्यांत सभोवतालच्या झाडांचा पालापाचोळा पडतो. त्यामुळे तळी बुजून जातात. या तळ्यांची साफसफाई करून ते पुन्हा पाणी साठवणुकीसाठी तयार करणे गरजेचे आहे.

## लहान प्राण्यांना फटका

**धरणालगतच्या पाणवठ्यावर मोठे वन्यजीव येतात; मात्र भयामुळे लहान प्राणी तिथे जात नाहीत. जंगलातील तळ्यांचे पाणी आटून गेल्याने त्यांना तिथेही पाणी मिळत नाही. ओलवण, देवर्डे, वाकीघोल, जांबरे, साळवण अशा भागांत वन्यजीव दिसतात, पाणी कमी झाल्याचा पहिला फटका वानरांना बसतो आणि ती रस्त्याकडेला येतात.**